# इयत्ता दहावी : विषय – मराठी

# सारांश लेखन

‘आपले म्हणणे थोडक्यात सांगा’ आजच्या धावपळीच्या युगातले हे परवलीचे वाक्य आहे. एखाद्या विस्तृत लेखनाला त्याचा संपूर्ण आशय लक्षात येईल अशा पद्धतीने संक्षिप्त रूप देणे, हे महत्त्वाचे कौशल्य आहे. हे कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने ‘सारांश लेखन’ या घटकाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**सारांश लेखनाच्या पायऱ्या :**

(१) दिलेल्या परिच्छेदाचे वाचन करणे.

(२) परिच्छेदातील आशयाचे आकलन होणे.

(३) मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

(४) समजलेला विचार स्वत: च्या शब्दांत थोडक्यात मांडणे

**कृतिपत्रिकेसाठी-**

(१) सारांश लेखन उतारा १०० ते १२० शब्दांचा असेल.

(२) दिलेल्या परिच्छेदाचा थोडक्या (कमीत कमी) शब्दांत सारांश लिहिणे अपेक्षित आहे.

(३) परिच्छेदाच्या सारांशातून संपूर्ण आशय लक्षात येणे अपेक्षित आहे.

(४) सारांश लेखनाची मध्यवर्ती कल्पना स्वत:च्या शब्दांत मांडणे अपेक्षित आहे.

(५) परिच्छेदाचे वा सारांशाचे शब्द मोजून नोंद करणे आवश्यक नाही.

## सारांश लेखन नमुना कृती

खालील उताऱ्याचेसारांश लेखन करा.

आपले जीवन सुखी समाधानी आणि यशस्वी व्हावे असे प्रत्येकाला वाटत असते; पण तसे होत नाही. उलट सर्वत्र पाहिले असता 'दु:ख मणभर, सुख कणभर' हाच अनुभव येतो; पण तसे का होते? मानवी जीवनात 'अहंकार' हा राक्षसच सर्व समस्या निर्माण करतो, कारण तो सूक्ष्म रूपातही असतो आणि स्थूल रूपातही. जोपर्यंत माणसाच्या ठिकाणी अहंकार आहे, तोपर्यंत त्याला ज्ञान प्राप्त होणे कठीण. माणसे अहंकाराचा फुगा कळत नकळत फुगवतच असतात. अज्ञानाला आलेला आकार म्हणजे अहंकार. या अज्ञानाचा नाश झाल्याशिवाय माणसाला सत्याचा आणि सुखाचा साक्षात्कार होणे शक्य नाही, म्हणून माणसाला सुखी आणि समाधानी जीवन जगायचे असेल तर अहंकारावर लक्ष केंद्रित करून त्याला ताब्यात ठेवले पाहिजे. अहंकारी माणूस निसर्गाला जिंकण्याची भाषा बोलतो तेव्हा तो हे विसरतो, की माणूस सुद्धा निसर्गाचा घटक आहे.

**प्रत्येक माणसाला दैनंदिन व्यवहारात सुखसमाधानाऐवजी प्रचंड दु:खाचा अनुभव येतो. याचे कारण म्हणजे माणसामध्ये असलेला अहंकाररूपी राक्षस होय. अहंकार विविध रूपांत माणसाला खऱ्या ज्ञानापासून वंचित ठेवतो. म्हणूनच स्वत: निसर्गाचा घटक असूनही माणूस निसर्ग जिंकण्याची भाषा करतो. माणसाने अहंकाराला जिंकायला पाहिज**